**RNI No. MAHBIL /2009/36619**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष ८, अंक ७१(२) ]** **सोमवार, ऑक्टोबर ३१, २०२२/कार्तिक ९, शके १९४४** **[पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००**

**असाधारण क्रमांक ११५**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप विभागीय अधिकारी, राजापूर यांजकडून

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअरा/भूसंपादन/एसआर-१०७/चिखलगाव/२०१५.—ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३० ) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ११ /२०१४ / प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ ( यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे. ) याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन ( यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन" असा करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी ( यात यापुढे जिचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे. ) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ( १ ) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहे. ( विस्थापन होणार असेल या अनुसुचीमध्ये कारणे नमूद करावीत. )

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र** भाग चार-अ क्रमांक ३८ दिनांक १३ मार्च २०१५ च्या अनुक्रमांक (क) अन्वये "संरक्षण सिध्दता " किंवा संरक्षण विषयक उत्पादन यासह भारताची राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षण या दृष्टिने महत्त्वाचे असे प्रकल्प यांना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई करण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. ज्याबाबत विस्तृत विवरण अनुसूची चार मध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करणेत येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट-कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकांने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकांस उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने त्या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकांऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ ( यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त नियम” असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यायावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचीत शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, राजापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

**जमिनीचे वर्णन मौजे - चिखलगाव, जड्यारवाडी लघु पाटबंधारे योजना धरणस्थळ, सांडवा व बुडीतक्षेत्रासाठी भूसंपादन.**
**गावाचे नाव - मौजे चिखलगाव, जड्यारवाडी - तालुका - राजापूर, जि. रत्नागिरी.**

| अनुक्रमांक (१) | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर/सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर (२) | क्षेत्र (हे. आर) (३) |
|---|---|---|
| १ | ८८६ | ०.०३.३० |
| २ | ८८४ | ०.११.७० |
| ३ | ८८३ | ०.०५.८० |
| ४ | ८८२ पै. | ०.०३.८० |
| ५ | ८८९ | ०.०४.८० |
| ६ | ८८८ | ०.०३.५० |
| ७ | ७८१ पै | ०.०२.५० |
| ८ | ७८५ | ०.०७.१० |
| ९ | ८०१ | ०.०६.३० |
| १० | ८८७ | ०.०३.३० |
| ११ | ९०९ | ०.१२.०० |
| १२ | ९०५ | ०.०२.०० |
| १३ | ८०३ पै | ०.२४.०० |
| १४ | ९०१ | ०.३१.०० |
| १५ | ८०२ | ०.१५.२० |
| १६ | ७९९ पै | १.७८.०० |
| १७ | ७९६ पै | ०.१५.०० |
| १८ | ७९५ पै | ०.१८.०० |
| १९ | ७९४ पै | ०.६०.०० |
| २० | ७९२ पै | ०.१८.०० |
| २१ | ७९३ पै | ०.८८.०० |
| २२ | ७७३ | ०.३२.०० |
| २३ | ७७२ | ०.५३.०० |
| २४ | ७७० | ०.५३.०० |
| २५ | ७६९ पै | ०.२६.०० |
| २६ | ७६८ पै | ०.०९.९० |
| २७ | ७६६ पै | ०.२१.०० |
| २८ | ७९१ | ०.०४.०० |
| २९ | ७७९ पै | ०.०४.०० |
| ३० | ७७८ पै | ०.१४.०० |
| ३१ | ७७७ पै | ०.१३.०० |
| ३२ | ७७६ पै | ०.२१.५० |
| ३३ | ७७५ | ०.०२.०० |
| ३४ | ९०७ पै | ४.३६.०० |
| ३५ | ९११ पै | १.१०.०० |

| अनुक्रमांक<br>(१) | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर/सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर<br>(२) | क्षेत्र (हे. आर)<br>(३) |
|---|---|---|
| ३६ | ९१० | ०.३४.०० |
| ३७ | ७९० पै | ०.२०.०० |
| ३८ | ७८७ पै | ०.०२.०० |
| ३९ | ७८६ | ०.०३.०० |
| ४० | ७८४ | ०.०६.१० |
| ४१ | ७८३ | ०.१३.१० |
| ४२ | ७८२ | ०.३९.०० |
| ४३ | ७७१ | ०.४१.०० |
| ४४ | ९०६ | ०.०३.०० |
| ४५ | ८९८ | ०.०५.०० |
| ४६ | ८९७ | ०.०५.०० |
| ४७ | ८०० | ०.१०.९० |
| ४८ | ९०० | ०.३९.०० |
| ४९ | ८९६ | ०.०२.०० |
| ५० | ८९५ | ०.०१.०० |
| ५१ | ८९४ | ०.०२.०० |
| ५२ | ८९३ | ०.०५.०० |
| ५३ | ८९२ | ०.०५.०० |
| ५४ | ८९० | ०.०६.०० |
| ५५ | ८९१ | ०.०७.०० |
| ५६ | ९०२ | ०.११.०० |
| ५७ | ९०३ | ०.०३.०० |
| ५८ | ९०४ | ०.०४.०० |
| ५९ | ९१९ पै | ०.६३.०० |
| ६० | ५३० | ०.०२.०० |
| ६१ | ७८८ पै | १.३५.०० |
| ६२ | ७७४ | ०.०३.०० |
| ६३ | ८९९ | ०.२९.०० |
| ६४ | ९२० पै | ०.३७.०० |
| ६५ | ८८५ | ०.०७.८० |
| ६६ | ७८९ | ०.२०.०० |
| ६७ | ९३१ | ०.१९.७० |
| ६८ | ७९७ | ०.०४.०० |
| ६९ | ७९८ | ०.०४.०० |
|  | **एकूण क्षेत्र** | **१८.९९.४०** |

## अनुसूची – दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपात विवरण

**प्रकल्पाचे नाव** - मौजे- चिखलगाव, जड्यारवाडी लघु पाटबंधारे योजना.

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन** - जड्यारवाडी लघु पाटबंधारे योजना धरणस्थळ, सांडवा व बुडीतक्षेत्रासाठी भूसंपादन.

**समाजाला मिळणारे लाभ** – या प्रकल्पामुळे १२० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे त्यामुळे कृषि उत्पन्नामध्ये वाढ होवून, मुबलक हिरवा चारा निर्माण होणार आहे. पाणी साठ्यामुळे मत्स्यपालन, बोटिंग, मासेमारी इत्यादी मुळे पर्यटनात वाढ होईल.

## अनुसूची – तीन

## बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

जड्यारवाडी लघु पाटबंधारे योजना अंतर्गत धरणस्थळ सांडवा व बुडीतक्षेत्रासाठी जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही म्हणून बाधीत कुटूंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

## अनुसूची – चार

## (समाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेली सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)

सचिव, भाकर सेवा संस्था, लांजा यांजकडील क्रमांक SIA/५६६/२०२२/२३ दिनांक – २५/०५/२०२२ अन्वये दिलेल्या प्रमाणपत्रानुसार जड्यारवाडी लघु पाटबंधारे प्रकल्पाचे धरणस्थळ, सांडवा व बुडीतक्षेत्रासाठी भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्टया कोणताही दुष्परिणाम आढळून येत नाही. सामाजिक परिणाम निर्धारण ( SIA ) पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याने आढळून आले आहे, असे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

## अनुसूची – पाच

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटूंबे नाहीत, त्यामुळे पुनर्वसन व पुनर्वसाहतीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**टिप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे, उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजापूर या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

रत्नागिरी,
दिनांक १७ ऑक्टोबर २०२२.

**वैशाली माने,**
उप विभागीय अधिकारी,
राजापूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.